मराठी साप्ताहिक

महाराष्ट्रातील अन्याया विरोधात वाचा फोडणारे एकमेव साप्ताहिक

# न्यूज प्रहार

मुख्य संपादिका : सुचिता राहुल हरपळे

मो.नं. : ९८५०२००६३८

newsprahar2021@gmail.com

www.newsprahar.com

● Volum 2 ● Issue : 27 ● Monday 22 JANUARY TO 28 JANUARY 2024 ● MARATHI ● WEEKLY ● Pune ● Price : 2 Rs/- ● RNI No. MAHMAR/2022/85015

● वर्ष २ रे ● अंक : २७ ● सोमवार २२ जानेवारी ते २८ जानेवारी २०२४ ● मराठी ● साप्ताहिक ● पुणे ● पाने : ४ ● किंमत : २ रूपये/- ● DECL. NO. SDM/SR/31/2022

## संक्षिप्त

### अमली पदार्थ विक्री करणारा गजाआड

पुणे (न्यूज प्रहार) : पुणे स्टेशन परिसरात मेफेड्रोन विक्रीसाठी आलेल्या एकाला गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्याच्याकडून एक लाख 69 हजार रुपयांचे आठ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. शेबाज शब्बीर कुरेशी (वय 24, रा. लष्कर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. गुन्हे शाखा अंमली पदार्थ विरोधी पथक दोनच्या पोलीस निरीक्षक अनिता हिवरकर आणि पथक गस्त घालत होते. पुणे स्टेशन परिसरात एक जण थांबला असून त्याच्याकडे मेफेड्रोन नावाचा अमली पदार्थ असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून कुरेशीला ताब्यात घेतले. त्याची झडती घेण्यात आली. त्याच्याकडून आठ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मेफेड्रोनची किंमत एक लाख 69 हजार रुपये आहे. याप्रकरणी कुरेशीविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपायुक्त अमोल झेंडे,सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिता हिवरकर, उपनिरीक्षक दिगंबर चव्हाण, चेतन गायकवाड, संदीप जाधव, रवींद्र रोकडे, महेश साळुंखे यांनी ही कारवाई केली.


### दारूसाठी चक्क पत्नीकडून पैशाची मागणी

पिंपरी (न्यूज प्रहार) : विवाहितेने दारू पिण्यासाठी पतीकडे वारंवार पैशांची मागणी केली. त्यावरून विवाहितेने आणि तिच्या बहिणीने छळ केला. त्याला कंटाळून पतीने आत्महत्या केली. देहूरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. याप्रकरणी विवाहिआ आणि तिच्या बहिणीला पोलिसांनी अटक केली.

# पुणे शहर कॉँग्रेस पक्षाचे नवीन खासदार कोण?

## कार्यकर्त्यांमध्ये तुफान चर्चा , नवीन उमदे नेतृत्व येणार का?

पुणे (न्यूज प्रहार प्रतिनिधी)
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)























पुणे शहर कॉँग्रेस पक्षाचे नवीन खासदार कोण? यासाठी इच्छुक उमेदवार अरविंद शिंदे, रमेश बागवे, संगीता तिवारी, कमल व्यवहारे, दत्ता बहिरट, वीरेंद्र किराड, चंदू शेठ कदम, बाळासाहेब शिवरकर, विश्वजीत कदम, या नावांची पुणे शहरांमधील कार्यकर्त्यांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. या उमेदवारांव्यतिरिक्त कॉँग्रेस आणखी कोणत्या नवीन चेहऱ्यांना संधी देत आहे का अशी ही चर्चा कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे नुकत्याच झालेल्या कसबा मतदारसंघातील पोटनिवडणुकी मधून निवडून आलेले रवींद्र धंगेकर हेही नाव जोरदारपणे चर्चेत आहे कारण बीजेपीचे उमेदवार हेमंत रासने यांचा एक लाखाने पराभव केल्यानंतर रवींद्र धंगेकर यांना खासदारकीची संधी मिळेल का अशी चर्चाही कार्यकर्त्यांमध्ये आहे. कॉँग्रेस पक्षाचे सर्वात जुने खासदार मोहन जोशी यांनी तीन वेळा खासदार झाले. त्यामुळे आता नवीन चेहरा मिळावा, व कॉँग्रेस पक्षाचे काम जोमाने सुरू करून एक धाडसी नेतृत्व मिळावे अशी कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे यामध्ये विश्वजीत कदम यांच्या नावाला जास्त पसंती मिळत असल्याचे कार्यकर्त्यांशी संवाद साधताना लक्षात आले. त्यामुळे या नावाचा विचार केला जाईल हे नाकारता येत नाही तसेच अविनाश बागवे यांनी मातंग समाज व इतर समाजाला धरून ठेवल्यामुळे त्यांचाही विचार केला जाऊ शकतो अशीही शक्यता असल्याची चर्चा आहे परंतु याच सोबत कॉँग्रेस पक्षासोबत असणारे धडाडीचे कार्यकर्ते अरविंद शिंदे, रमेश बागवे, संगीता ताई तिवारी, गोपाळ दादा तिवारी, कमलताई व्यवहारे, दत्ता बहिरट, वीरेंद्र किराड, चंदू शेठ कदम, बाळासाहेब शिवरकर हेही अनुभवी व धडाडीचे कार्यकर्ते आहेत यांच्यामुळेच कॉँग्रेस पक्ष पुण्यामधून सक्रियपणे काम करत आहे त्यामुळेच आता पुण्याचे कॉँग्रेस पक्षाचे नवीन खासदार कोण ही चर्चा सुरू झालेली आहे पाहूया कॉँग्रेस पक्ष नक्की कोणाला संधी देईल.

# प्रियेसीच्या आईचा गळा दाबून खून, पाषाणमधील घटना

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)

प्रेमाला विरोध केल्याने गर्लफ्रेंडच्या आईचा तरूणाने पट्टयाने गळा आवळून खून केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. पाषाण- सुस रस्त्यावरील एका सोसायटीत ही घटना घडली. याप्रकरणी तरुणाला चतुःश्रृंगी पोलिसांनी अटक केली आहे. वर्षा क्षीरसागर (वय ५८, रा. माउंटव्हर्ट अ‍ॅल्टसी सोसायटी, पाषाण-सूस रस्ता) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी शिवांशू दयाराम गुप्ता (वय २३, रा. मोहनवाडी, येरवडा) याला अटक करण्यात आली आहे. याबाबत तरूणीने चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी तरूणी आणि शिवांशू यांचे गेल्या सात महिन्यांपासून प्रेमसंबंध होते. मात्र, काही दिवसांपासून त्यांच्यात वादविवाद झाले होते.

त्यामुळे तरुणीने शिवांशूसोबत प्रेमसंबंध ठेवण्यास नकार दिला होता. वर्षा क्षीरसागर यांनी त्याला मुलीसोबत प्रेमसंबंध ठेवू नको, असे बजावले होते. त्यामुळे शिवांशू तरुणीच्या आईवर चिडला होता. तो रात्री बाराच्या सुमारास माउंटव्हर्ट अ‍ॅल्टसी सोसायटीत गेला. त्याने वर्षा यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यांचा पट्टयाने गळा आवळून खून केला. सुरुवातीला याप्रकरणी आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली होती. चौकशीनंतर वर्षाचा खून झाल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांनी आरोपी शिवांशूला अटक केली. पोलीस निरीक्षक जगन्नाथ जानकर तपास करीत आहेत.

## श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळ्यानिमित्त

# प्रभू श्रीराम महाआरती


## शिवाजी माधवराव मानकर यांची माहिती; रामगीते, शंखनाद, रामायण नृत्याचेही सादरीकरण

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



अखंड हिंदुस्थानातील रामभक्तांचे श्रद्धास्थान असलेले प्रभू श्रीराम अयोध्येतील राम मंदिरात येत्या सोमवारी (दि. २२ जानेवारी) विराजमान होत आहेत. श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळ्याने संपूर्ण देश राममय झाला असून, हा आनंदसोहळा साजरा करण्यासाठी सोमवारी (दि. २२) प्रभू श्रीराम महाआरती व अध्यात्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे," अशी माहिती आयोजक शिवाजी माधवराव मानकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. नारायण पेठेतील गुप्ते मंगल कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेवेळी ॲड. मंदार जोशी, अमित जाधव, विजय आढाव, यश वालिया, ॲड. नितीन साबळे, अभिजीत देशपांडे, राज जैन, सुरज शर्मा आदी उपस्थित होते. शिवाजी माधवराव मानकर म्हणाले, "राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग तथा संसदीय कामकाजमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शुभहस्ते सोमवारी सायंकाळी ५ वाजता राजाराम पुलाजवळील महालक्ष्मी लॉन्समध्ये या महाआरती व भव्यदिव्य कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष दीपकभाऊ मानकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या महाआरतीसाठी चार ते पाच हजार रामभक्त येणार आहेत." "ढोल-ताशा वादनाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. गायक हेमंत ब्रिजवासी यांच्या मधुर आवाजातील रामगीते, जयपूर येथील नृत्य समूहाचे रामायणावरील विलोभनीय नृत्याविष्कार सादर होतील. शंखनाद, धुपआरती आणि फटाक्यांच्या आतषबाजीने हा आनंदोत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानंतर अयोध्येतील शरयूतीरी आरती करणारा समूह गंगा घाट आरती करणार आहे. प्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. प्रथमच ही गंगा महाआरती होत असल्याने अधिकाधिक पुणेकरांनी उपस्थित राहावे," असे शिवाजी माधवराव मानकर यांनी नमूद केले.

ॲड. मंदार जोशी म्हणाले, "शिवाजी माधवराव मानकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून हा महाआरती सोहळा होत आहे. फ्रेंड्स ऑफ बीजेपीच्या माध्यमातून मानकर यांनी आजवर सामाजिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. भक्तीमय वातावरणातील या सोहळ्याला होणारी गर्दी लक्षात घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने सर्वतोपरी काळजी घेण्यात आली आहे. फिरते शौचालय, अग्निशमन व्यवस्था, ॲम्ब्युलन्स याठिकाणी तैनात असणार आहे."



## संपादकीय...!

# खासदार बाईंनी चोरी केली

४२ वर्षीय गोलरिझ घाहर्मन या न्यूझीलंडच्या संसद सदस्य आहेत. त्या न्यूझीलंडच्या राष्ट्रीय राजकारणातील काहीशा डावीकडे झुकलेल्या विचारसरणीच्या ग्रीन पार्टीच्या सदस्य आहेत. गोलरिझ या त्या पार्टीच्या कायदाविषयक प्रवक्त्यादेखील आहेत. त्यांच्यावर वेगवेगळ्या कपड्यांच्या महागड्या बुटिक्समधून तीन वेळा कपडे चोरल्याचा आरोप करण्यात आला. यापैकी एक घटना ऑकलंड या शहरातील महागड्या कपड्यांच्या दुकानातील आहे, तर दुसरी घटना वेलिंग्टन हाय एन्ड क्लोथ्स रिटेलर या दुकानातील आहे. या तीनही घटना २०२३ सालच्या उत्तरार्धात घडल्या, असा गोलरिझ यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. त्यामुळे पोलिसांनी त्यांची चौकशी सुरू केली. या सगळ्या पार्श्वभूमीवर गोलरिझ घाहर्मन यांनी त्यांच्या संसदेच्या सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला आहे. राजीनामा देतेवेळी गोलरिझ म्हणाल्या "माझ्या या कृत्याचं मी समर्थन करणार नाही. पण, अति ताणामुळे हे माझ्याकडून घडलं आहे."

अति ताणामुळे असं काहीतरी कृत्य करावं, असा कुठला ताण गोलरिझ यांच्यावर आहे? गोलरिझ यांचा जन्म इराणमधला. त्या लहानपणी त्यांच्या आई - वडिलांबरोबर इराणमधून पळून न्यूझीलंडमध्ये आल्या. त्यांच्या आई - वडिलांनी न्यूझीलंडमध्ये राजकीय आश्रय मागितला. एखाद्या कुटुंबाला ज्यावेळी जीव वाचवण्यासाठी आपल्या देशातून दुसऱ्या देशात पळून जाण्याची वेळ येते, त्यावेळी त्या कुटुंबात अनेक उलथापालथी झालेल्या असतात. तो सगळा प्रवासच अनिश्चिततेने भरलेला असतो. आपला देश, आपली माणसं, आपली संस्कृती, आपलं सगळं आयुष्य मागे सोडून यायचं; त्यात नवीन देश आपल्याला स्वीकारेल की नाही, ते माहिती नाही. त्या देशाने नाकारलं तर काय करायचं, हे माहिती नसतं, अशी परिस्थिती असते. गोलरिझ यांच्या कुटुंबीयांना सुदैवाने न्यूझीलंडने राजकीय आश्रय दिला. मात्र, इराणसारख्या बंदिस्त सांस्कृतिक देशातून न्यूझीलंडसारख्या तुलनेने मोकळ्या संस्कृतीत जगायला शिकणं, हाही एक कठीण प्रवास या कुटुंबाने पार पाडला.

मोकळ्या विचारांच्या देशात लहानपणापासून राहायला मिळाल्याचा पूर्ण फायदा गोलरिझ यांनी घेतला. त्यांनी कायद्याचं शिक्षण घेतलं. ते पूर्ण केल्याच्या नंतर संयुक्त राष्ट्रसंघासाठी मानवाधिकार विशेषज्ञ वकील म्हणून काम केलं. आंतरराष्ट्रीय फौजदारी लवादांमध्ये काम केलं. त्यानंतर त्यांनी न्यूझीलंडच्या राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला. ग्रीन पार्टीबरोबर काम करायला सुरुवात केली. त्या २०१७ साली संसदेवर निवडूनदेखील आल्या. न्यूझीलंडमध्ये राजकीय आश्रय घेतलेल्या व्यक्तींपैकी संसदेत निवडून आलेल्या गोलरिझ या पहिल्या!

मात्र, त्यांचा पुढचा प्रवास कठीण ठरला. त्यांच्यावरील चोरीचे आरोप जाहीर होण्याच्या आधी त्यांच्यावर पॅलेस्टाइनच्या बाजूने होणाऱ्या निदर्शनात भाग घेतल्याबद्दल खूप टीका झाली. ग्रीन पार्टीचे एक नेते जेम्स शॉ म्हणतात की, गोलरिझ यांच्या संसदेतील संपूर्ण सहा वर्षांच्या काळात त्यांच्यावरील ताण सतत वाढताच राहिलेला आहे. त्यात कामाचा ताण हा एक भाग आहेच. मात्र, त्याचबरोबर आशियाई वंशाची महिला असल्यामुळेही त्यांच्यावर एक वेगळ्या प्रकारचा ताण आहे. जेम्स शॉ म्हणतात, "गोलरिझ निवडून आल्या दिवसापासून त्यांना लैंगिक हिंसेच्या, शारीरिक हिंसेच्या, इतकंच नाही तर ठार मारण्याच्यादेखील धमक्या सतत मिळत आहेत. तुम्ही जर सतत इतक्या तणावाखाली जगत राहिलात आणि काम करत राहिलात तर त्याचे कुठले ना कुठले परिणाम तुमच्यावर होतील हे तर उघडच आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्यावर पराकोटीचा ताण आहे हे लक्षात आलं आहे आणि त्यांनी ते मान्य केलं आहे, याबद्दल मला त्यांचं कौतुक आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते." गोलरिझ म्हणतात, "माझ्यावर असलेल्या ताणामुळे मी अशी काही कृत्य केली आहेत, जी मी एरवी कधीच केली नसती. त्या कृत्यांचं समर्थन होऊच शकत नाही. मात्र, हे माझ्याकडून का घडलं, याबद्दल मी स्पष्टीकरण देऊ शकते. मी आत्ता ज्या मनोविकारतज्ज्ञांचा सल्ला घेते आहे. ते म्हणतात की, माझं सध्याचं वागणं, हा पराकोटीचा ताण आणि पूर्वीचा त्यावेळी लक्षात न आलेला मानसिक धक्का यांचा एकत्रित परिणाम आहे. मी माझ्यावर विश्वास टाकणाऱ्या लोकांचा अपेक्षाभंग केला आहे आणि त्याबद्दल मी त्यांची माफी मागते. माझ्या वागणुकीचं कुठल्याही प्रकारे समर्थन होऊ शकत नाही!' सततचा मानसिक ताण आणि या चोरीच्या घटनांमुळे गोलरिझ यांनी अखेर संसद सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला आहे. मात्र, या राजीनाम्यामुळे त्यांच्या विषयातील एक वेगळा दृष्टिकोन आणि एकाकी आवाज हरवल्याची भावना ग्रीन पार्टीच्या सदस्यांनी व्यक्त केली. त्या म्हणतात, 'वैद्यकीय चाचण्या केल्यानंतर माझ्या हे लक्षात आलं आहे, की माझी तब्येत सध्या बरी नाही'.

# उपमुख्यमंत्री यांच्याकडून बसस्थानकाच्या कामांचा आढावा

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत शिवाजीनगर बसस्थानक आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील उड्डाणपूल कामांचा आढावा घेतला.

बैठकीला आमदार सिद्धार्थ शिरोळे, सुनील टिंगरे, विभागीय आयुक्त सौरभ राव, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे पोलीस आयुक्त रितेश कुमार, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख,पीएमआरडीएचे आयुक्त राहुल महिवाल, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता बप्पा बहिर आदी उपस्थित होते.

महामेट्रोने त्यांच्या खर्चातून करावयाची कामे त्वरित सुरू करावी. उर्वरित इमारतीच्या कामासाठी राज्य शासनातर्फे निधी देण्यात येईल. राज्य परिवहन महामंडळाने इमारतीतील त्यांना आवश्यक जागेची माहिती द्यावी, इतर जागेत शासकीय कार्यालयासाठी जागा देण्याबाबत प्रशासनाने माहिती घ्यावी, असे श्री.पवार यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्गावर वाहतूक वळविण्याबाबत विचार व्हावा. ब्रेमेन चौकातून जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीचे कामे पुणे महानगरपालिकेने तातडीने करावे. कृषी महाविद्यालय ते सिंचन नगर मैदानाकडून जाणाऱ्या रस्त्यावर दुचाकी आणि कारची वाहतूक वळविण्यात यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

बसस्थानक कामाचा आराखडा प्राप्त झाला असून पुढील अडीच वर्षात शिवाजीनगर येथील बसस्थानाकाचे काम पूर्ण करण्यात येईल, असे श्री. हर्डीकर यांनी सांगितले.

बैठकीला यशदाचे अतिरिक्त महासंचालक सचिंद्र प्रताप सिंह आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्र्यांसमोर सहकार भवनचेही सादरीकरण करण्यात आले. यावेळी सहकार आयुक्त अनिल कवडे उपस्थित होते. आराखड्यात सभागृहाची क्षमता वाढविण्याबाबत विचार करावा, साखर संकुल आणि पणन विभागाची गरजही लक्षात घ्यावी,अशी सूचना श्री.पवार यांनी केली.

### यशदाला देशातील सर्वोत्तम प्रशिक्षण संस्था करा

उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी यशदाच्या मास्टर प्लॅनचा आढावा घेतला. यशदाला भारतातील सर्वोत्तम संस्था करण्यासाठी आराखडा तयार करावा, त्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल. आदर्श आराखड्यासाठी स्पर्धा घेण्यात यावी आणि त्यातून उत्तम कल्पनांचा समावेश अंतिम आराखड्यात करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

# अन्न व औषध प्रशासनाच्या धडक मोहिमेत पुणे शहरात 47 लाख रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



अन्न व औषध प्रशासन विभागाने पुणे शहरात टोनी दा ढाबा, पाषाण सर्व्हिस रोड, पाषाण येथील धडक मोहीमेत एमएच ४६ एआर ४९७३ या वाहनाचा पाठलाग करून ४७ लाख २२ हजार ३०० रुपयांचा प्रतिबंधित साठा व एक वाहन जप्त करण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाने दिली आहे. औषध प्रशासनाच्या मंत्रालयीन कार्यालयातून प्राप्त गोपनीय माहितीच्या अनुषंगाने ही मोहीम राबविण्यात आली. या मोहमेअंतर्गत १ वाहन जप्त करण्यात आले असून चतुःश्रृंगी पोलिस स्टेशनमध्ये वाहनचालकासह तिघांवर एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत. जनहित व जनआरोग्याच्या दृष्टिकोनातुन राज्यात गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखु, सुगंधित सुपारी इत्यादी तंबाखु जन्य पदर्थावर उत्पादक साठा, वितरण, वाहतुक तसेच विक्री यावर १ वर्षाकरीता बंदी घातलेली आहे.

प्रतिबंधीत गुटखा, पान मसाला इत्यादीच्या विक्री बाबतची माहिती असल्यास जागरुक नागरिकांनी प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ यावर संपर्क साधावा, असे आवाहन पुणे विभागाचे सह आयुक्त (अन्न) अ. गो. भुजबळ यांनी केले आहे.

# मनपा कंत्राटी कामगारांच्या नाम फलकाचे उद्घाटन

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



पुणे महानगरपालिकेतील येरवडा विभागातील राष्ट्रीय मजदूर संघाच्या सभासद असणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या नामपालकाचे उद्घाटन कामगार नेते व राष्ट्रीय मतदार संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे आयोजन संघटनेचे कंत्राटी सफाई कामगार संघटक शरद भाकरे यांनी केले यावेळी बोलताना कामगार नेते सुनील शिंदे म्हणाले कंत्राटी कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत हे प्रश्न सोडवण्यासाठी महापालिकेतील अधिकारी उदासीन असून संघर्ष करूनच कंत्राटी कामगारांना हे प्रश्न सोडवावे लागतील त्यासाठी सर्व कंत्राटी कामगारांची एकजूट ही अत्यंत महत्त्वाची आहे संघटनेचे उपाध्यक्ष सिताराम चव्हाण सेक्रेटरी एस के पळसे विजय पांडव बाबा कांबळे रवींद्र आगम जानवी दिघे धुळेकर ताई उज्वल साने मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कामगार उपस्थित होते.



# श्री रोकडोबा मंदिर ग्रामदैवत स्वच्छता अभियान

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)

छत्रपती शिवाजी महाराज गावठाण रोकडोबा मंदिर ग्रामदैवत या मंदिरामध्ये स्वच्छता अभियानासाठी भाजप महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे साहेब रोकडोबा मंदिराला भेट दिली यावेळी तानाजी शिरोळे रोकडोबा मंदिर विश्वस्त यांनी शाल श्रीफळ व रोकडोबा महाराजांचा फोटो देऊन रोकडोबा मंदिर ग्रामदैवत व समस्त ग्रामस्थ मंडळींच्या वतीने सत्कार करण्यात आला याप्रसंगी आमदार सिद्धार्थ शिरोळे माजी महापौर मुरलीधर मोहोळ मा.नगरसेवक आदित्य माळवे भाजप नेते सुनिल देवधर साहेब दत्तात्रय खाडे सतीश चव्हाण राहुल शिरोळे विजय बहीरट बाबा शिरोळे गिरीश बहिरट शैलेश बडदे राहुल दुर्गे अर्जुन पालकर दिनकर घारे अजय शिंदे अनिल बहीरट उमेश गोरे शेलारमामा अशोक लोखंडे जोशनाताई एकबोटे स्वाती लोखंडे मुरलीधर मुसळे गणेश बागडे अपूर्व खाडे निलेश रेणुसे इतर मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# दलित पँथर सारख्या संघटनेची आज पुन्हा गरज

## शैलेश चव्हाण अध्यक्ष आरपीआय पुणे : दलित पँथरचे संस्थापक विद्रोही कवी साहित्यिक आक्रमक नेते

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



नामदेव ढसाळ यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रम मध्ये मा.नगरसेवक प्रदीप गायकवाड व रिपाइंचे शहराध्यक्ष अध्यक्ष शैलेश चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून राहूल दादा तायडे यांनी मेणबत्ती व अगरबत्ती लावावू त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केले.यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.भवानी मतदारसंघाचे कॉंग्रेस अध्यक्ष सुजित यादव बीएसपी कैलास ओव्हाळ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नितीन रोकडे सुनील भोईटे गौतम सवाणे राष्ट्रीय मोस्टो योद्धा बंडू गायकवाड सोहन जी परदेशी दीपक शिंदे राजू गवळी विक्रम कांबळे उत्तम बनसोडे राष्ट्रवादी युवा नेते महाराष्ट्र प्रदेश मयूर गायकवाड संतोष बनसोडे दलित नंतरची ज्येष्ठ नेते प्रभाकर सोनकांबळे विठ्ठल केदारी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. अभिवादन करते वेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट शहराध्यक्ष शैलेश चव्हाण यांनी नामदेव ढसाळ यांनी केलेल्या कार्याचा गौरव करून आज बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसारांचा अन्यायाविरुद्ध लढण्याची सर्वसामान्य जनतेला व कार्यकर्त्यांना बळ देणारा एकमेव नेता म्हणजे दलित त्यांच्या संस्थापक विद्रोही कवी नामदेव दादा होते त्यांच्या दलित पँथर या संघटनेमुळेच आज अनेक राष्ट्रीय पक्षात सत्तेचा उपभोग घेणारे कार्यकर्ते निर्माण झाले आहेत पुन्हा एकदा त्यांच्या विचाराचा झंझावात आपण जोपासला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने दादांना श्रद्धांजली वाहिली आहे असे होईल. दादांनी अनेकांसाठी वेगवेगळी आंदोलन केली नामांतरचा लढा असेल महार वतनाची जमीन असेल गायरान जमीन असेल मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अन्यायाविरुद्ध लढणारी त्यावेळची एकमेव संघटना म्हणजे नामदेव दादांची दलित पँथर अशा या दादांना मी अभिवादन करतो

या कार्यक्रमाचे आयोजन गेले 40 वर्ष सतत पँथर मध्ये नामदेव ढसाळ यांच्या आदेशावरून बरोबरीने काम करणारे दलित पँथर पुणे शहराच्या अध्यक्ष प्रकाश साळवे यांनी केले. संजय शिंदे यांनी बौद्ध वंदना घेऊन या कार्यक्रमाची सुरुवात केली.

# ज्येष्ठ नागरिक मंडळाच्यावतीने वर्धापनदिन संपन्न

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



ज्येष्ठ नागरिक मंडळ कै. वसंतराव चव्हाण विरंगुळा केंद्र छत्रपती शिवाजीनगर गावठाण पुणे यांच्यावतीने वर्धापन दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार सिद्धार्थ शिरोळे संतसिंग मोखा उद्योजक रणजीत शिरोळे मनसे नेते ॲड संध्याताई देशपांडे सरकारी वकील यांनी छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली तसेच शाल श्रीफळ व छत्रपतीचा फोटो देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विषयी चांगले मार्गदर्शन केले तसेच ज्येष्ठ नागरिकांचे 75 वर्षे पूर्ण झाले त्यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच ऋतिक मारणे वॉल क्लाइंबिंग क्रीडा क्षेत्रात शिवछत्रपती पुरस्कार महाराष्ट्र शासन व रणजीत शिरोळे दक्षिण आफ्रिकेत जागतिक मॅरेथॉन स्पर्धेत मानाची स्पर्धा पूर्ण केली तसेच सायना शेख वॉल क्लाइंबिंग क्षेत्रात चायना येथे भारताचे नेतृत्व केले होते व सई ढगे शालेय क्रिकेट क्षेत्रांत या सर्व खेळाडूंचा पाहुण्यांच्या हास्ते शाल छत्रपती शिवाजी महाराजांची फोटो श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी मंडळाचे अध्यक्ष सुरजितसिंग मोखा तानाजी शिरोळे विजय बहीरट अंकुश ढगे रमेश रोकडे विठ्ठल शिरोळे भानुदास शेलार विलास पाटील सौ शोभाताई बोडके सौ अंजली पवळे या सर्वांनी नियोजन केले होते.तसेच कमलताई दिघे यांनी प्रास्ताविक केले विजय बहीरट यांनी सूत्रसंचालन केले तसेच तानाजी शिरोळे कार्याध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानले बहुसंख्येने जेष्ठ नागरिक उपस्थित होते

वाचकांसाठी निवेदन : साप्ताहिक न्यूज प्रहार या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत तसेच जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास परिणामांबद्दल साप्ताहिक न्यूज प्रहार वृत्तपत्र व्यवस्थापन, मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.
- संपादक / मुख्य व्यवस्थापक

• न्यूज प्रहार हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादिका सुचिता राहुल हरपळे यांनी आर्यन प्रिंटर्स, सर्वे नंबर 1570 फुरसुंगी, चंदवाडी, ता. हवेली, जि. पुणे -412308 येथे छापून सर्वे नंबर 1570 फुरसुंगी, चंदवाडी, ता. हवेली, जि. पुणे- 412308 येथून प्रकाशित केले.

• साप्ताहिक न्यूज प्रहार यह समाचार पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक सुचिता राहुल हरपळे इन्होने आर्यन प्रिंटर्स स.नं.1570 फुरसुंगी चंदवाडी ता. हवेली,जि. पुणे 412308 से छपवाकर स.नं.1570 फुरसुंगी, चंदवाडी ता. हवेली,जि. पुणे 412308 प्रकाशित किया. • पंजीकृत ऑफिस : फुरसुंगी, चंदवाडी ता. हवेली, जि. पुणे 412308 फोन : 9850200638 • संपादकीय और प्रशासनिक पत्राचार कार्यालय : स.नं.1570/ फुरसुंगी, चंदवाडी ता. हवेली जि.पुणे 412308 • फोन नं 9850200638/9284661144 • समस्त न्यायिक विवादों के लिए क्षेत्र अधिकार पुणे होगा। • ई- मेल : newsprahar2021@gmail.com

• NEWS PRAHAR is a weekly News Paper Printed, Published and Owner by Suchita Rahul Harpale • Printed at Aryan Printers, Sr. No 1570 Phursungi, chandwadi,Tal -Haveli Dist-Pune 412308 And Published at Sr.No 1570 Phursungi, chandwadi,Tal -Haveli, Dist-Pune 412308 Mobile no 9850200638/9284661144 • Editor: Suchita Rahul Harpale, (Responsible for editorial content as per PRB act) • RNI No. : MAHMAR/2022/85015 • E -Mail: newsprahar2021@gmail.com

• News paper Legal cases will be settled in Pune Court • The Legal adviser is Adv. Sandeep Dadasaheb Auti • Mob no - 9404292222

# थोडक्यात

## राजर्षी शाहू शिक्षण परिषदेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी डॉ. हनुमंत भोपाळे यांची निवड



नांदेड (न्यूज प्रहार) : नांदेड येथील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा व्याख्याते प्रोफेसर डॉ. हनुमंत मारोतीराव भोपाळे यांची राजर्षी शाहू शिक्षण परिषदेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. डॉ. हनुमंत भोपाळे यांचे साहित्यिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्य लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली. डॉ. हनुमंत भोपाळे यांचे यशाचा राजमार्ग, ध्येयवेध, समृध्दीच्या वाटा, प्रगतीचे विचारधन, दीपस्तंभ, साफल्य, उत्तम प्रशासक, प्रेरणा, पुन्हा प्रेरणा, परिवर्तन, मनतरंग, साधना, शीख गुरू चरित्र आणि कार्य हे ग्रंथ आणि शेकडो लेख प्रकाशित असून वक्ता नात्याने हजारो व्याख्यानाच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या बहि:शाल व्याख्यानमालेचा व्याख्याता म्हणून म्हणून ते प्रबोधन करतात. अनेक शैक्षणिक विषयक लेख, भाषणे असून Hanumantbhopale या यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास, शैक्षणिक विकास याविषयावर त्यांचे अनेक व्याख्याने प्रसारित आणि लोकप्रिय झाली आहेत. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र, संमेलनात त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांतही त्यांचा सक्रिय सहभाग असतो. गोव्यात संपन्न झालेल्या दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन डॉ. हनुमंत भोपाळे यांची राजर्षी शाहू शिक्षण परिषदेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवश्री कामाजी पवार आणि मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय सचिव शिवश्री प्रदीप पाटील यांनी डॉ. हनुमंत भोपाळे यांना दिले. या निवडीबद्दल डॉ.हनुमंत भोपाळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## इंडियन ऑइल कॉर्पोरेशनमध्ये अप्रेंटिस पदांसाठी भरती, असा करा अर्ज

पुणे (न्यूज प्रहार) : इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (IOCL) ने तंत्रज्ञ, पदवीधर आणि ट्रेड अप्रेंटिस पदांसाठी 473 रिक्त जागा सोडल्या आहेत. इच्छुक आणि पात्र उमेदवार अधिकृत वेबसाइट iocl.com वर जाऊन ऑनलाइन अर्ज करू शकतात. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ०१ फेब्रुवारी २०२४ आहे.

शैक्षणिक पात्रता : इच्छुक उमेदवारांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा बोर्डातून 12वी/ ITI/ डिप्लोमा/ कोणतीही पदवी धारण केलेली असावी.

वयोमर्यादा : इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (IOCL) मध्ये शिकाऊ पदांच्या भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची किमान वयोमर्यादा 18 वर्षे आणि कमाल वयोमर्यादा 24 वर्षे असावी. सरकारी नियमांनुसार वयात सवलत दिली जाईल.

प्रशिक्षण कालावधी : तंत्रज्ञ, व्यापार आणि डेटा एंट्री ऑपरेटर आणि डोमेस्टिक डेटा एंट्री ऑपरेटर अप्रेंटिस या पदांसाठी निवडलेल्या उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी 12 महिन्यांचा असेल. लेखी परीक्षेच्या आधारे उमेदवारांची निवड केली जाईल. लेखी परीक्षा १२० मिनिटे म्हणजेच दोन तासांची असेल. उमेदवार हिंदी आणि इंग्रजी भाषेत प्रश्नपत्रिका घेऊ शकतात.

संस्थेचे नाव: इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (IOCL)
पोस्टचे नाव: तांत्रिक आणि नॉन-टेक्निकल अप्रेंटिस
पदांची संख्या: 473 पोस्ट
अर्ज सुरू होण्याची तारीख: सुरुवात केली
अर्ज करण्याची शेवटची तारीख: 1 फेब्रुवारी 2024
अर्जाची पद्धत: ऑनलाइन
निवड प्रक्रिया काय आहे?

निवड प्रक्रियेमध्ये लेखी चाचणी आणि गुणवत्ता यादी समाविष्ट असते; उमेदवार अधिकृत वेबसाइट iocl.com किंवा https://iocl.com/apprenticeships वर अधिक तपशील शोधू शकतात.

## १७ विद्यापीठांना यूजीसीचा दणका




पुणे (न्यूज प्रहार) : विद्यापीठ अनुदान आयोगाने देशभरातील विद्यापीठांना लोकपाल नियुक्ती करण्याबाबत आदेश दिले होते. मात्र, देशातील अनेक विद्यापीठांनी त्याचे पालन केले नाही. दरम्यान, देशभरातील ४२१ विद्यापीठांनी लोकपाल नियुक्तीबाबतची माहिती यूजीसीकडे सादर केलेली नाही. लोकपाल नियुक्तीचा तपशील सादर न केलेल्या विद्यापीठांमध्ये राज्यातील सरकारी आणि खासगी विद्यापीठांचाही समावेश आहे. या यादीमध्ये महाराष्ट्रातील १७ विद्यापीठांचा समावेश आहे. यूजीसीने विद्यापीठांना ३१ डिसेंबरपर्यंत नियमानुसार लोकपाल नियुक्त करण्याचा इशारा दिला होता. परंतु, दिलेल्या मुदतीनंतरही विद्यापीठांनी नियमांची पूर्तता केली नाही. या विद्यापीठांची यादी यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रकाद्वारे जाहीर केली दिली. महाराष्ट्रासह यूपी, हरियाणा, हमाचल, उत्तराखंड, जम्मू काश्मीर, दिल्ली, पंजाब, तेलंगणा, पश्चिम बंगाल आदी राज्यांमधील विद्यापीठांचा डीफॉल्ट यादीत समावेश केला आहे. यामध्ये सर्वाधिक २५६ राज्य विद्यापीठे आहेत. नॉर्थ-ईस्टर्न हिल्स युनिव्हर्सिटी, शिलाँग हे एकमेव केंद्रीय विद्यापीठ आहे. तर १६२ खासगी विद्यापीठे आणि दोन डीम्ड-टू-बी विद्यापीठे आहेत. यामध्ये राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ वगळता राज्यातील बहुतांश सर्व विद्यापीठांची नावे आहेत.

## कयानी बेकरीच्या नावाने बनावट संकेतस्थळ, सायबर चोरट्यांकडून ग्राहकांची फसवणूक




पुणे (न्यूज प्रहार) : पुण्यातील लष्कर भागातील प्रसिद्ध कयानी बेकरीच्या नावाने बनावट संकेतस्थळ उघडून सायबर चोरट्यांनी ग्राहकांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत कयानी बेकरीचे मालक रुस्तम कयानी यांनी पोलिसांकडे तक्रार अर्ज दिला आहे. कयानी बेकरीच्या नावाने सायबर चोरट्यांनी बनावट संकेतस्थळ उघडले. ग्राहकांनी या संकेतस्थळावर ऑर्डर नोंदविल्या होत्या. ऑनलाइन पद्धतीने ग्राहकांनी या संकेतस्थळावर ऑर्डर दिल्या होत्या. दरम्यान, संकेतस्थळावरील कयानी बेकरीचा मोबाइल क्रमांक सायबर चोरट्यांचा आढळून आले. चोरट्यांनी या क्रमांकाद्वारे ग्राहकांकडून पैसे उकळले आहेत. चोरट्यांनी आतापर्यंत ग्राहकांची हजारो रुपये उकळले असल्याचे रुस्तम कयानी यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे. कयानी यांनी लष्कर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेंद्र मोरे चौकशी करत आहेत. अद्याप याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

# दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते कृत्रिम अवयव वाटप

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



फियाट ऑटोमोबाईल्स प्रा. लिमिटेड रांजणगाव यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम अवयवाचे वाटप सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. समाजातील दिव्यांग मुलांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन श्री. वळसे पाटील यांनी यावेळी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, फियाट इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष राकेश बवेजा, सहाय्यक उपाध्यक्ष संचिता कुमार, प्रदीप मुनगंटीवार, गट शिक्षण अधिकारी सविता माळी गट विकास अधिकारी अर्चना कोल्हे, प्रदीप वळसे पाटील, बाळासाहेब बाणखेले, उदय पाटील, प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

श्री.वळसे पाटील म्हणाले, समाजामध्ये अनेक मुलं हे दिव्यांग असल्याने त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता असते. त्यांना वेळीच मदतीचा हात दिल्यास त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होऊन ते सक्षमपणे जीवन जगू शकतील. यासाठी फियाट इंडिया ऑटोमोबाईल्सने जुन्नर, आंबेगाव व खेड या तीन तालुक्यातील दिव्यांगांसाठी कृत्रीम अवयवे व संसाधने वाटप करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. या उपक्रमामुळे या दिव्यांग मुलांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्री. बवेजा आणि संचीता कुमार यांनीही मनोगत व्यक्त केले. शिबिरात १५३ दिव्यांग विद्यार्थ्यांना मंत्री वळसे पाटील, राकेश बवेजा यांच्या हस्ते कृत्रिम अवयव व संसाधनांचे वाटप करण्यात आले.

फियाट ऑटोमोबाईल्स प्रा. लिमिटेड रांजणगाव यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून मंचर येथील रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाला ४० संगणक भेट देण्यात आल्याने तयार करण्यात आलेल्या संगणक प्रयोगशाळेचे उदघाटन मंत्री श्री.वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन एस. गायकवाड. उदय पाटील, बाळासाहेब बाणखेले यावेळी उपस्थित होते.

या प्रसंगी बोलतांना श्री.वळसे पाटील म्हणाले, फियाट कंपनीच्या माध्यमातून मिळालेले संगणक संच, याचा फायदा महाविद्यालयीन विद्यार्थीनी चांगल्या पद्धतीने करावा आणि रोजगारासाठी आवश्यक कौशल्य प्राप्त करून घ्यावे. स्वतः रोजगार निर्मिती करून सक्षम बनावे. स्पर्धेच्या युगात उन्नत संगणकीय ज्ञान आवश्यक असून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातच ते आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## रामवाडीपर्यंत मेट्रो लवकरच धावणार; अंतिम तपासणी सुरु

नांदेड
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील विस्तारित सेवा लवकरच सुरू होणार आहे. या मार्गाचे काम पूर्ण झाले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या पथकाने मागील आठवड्यात या मार्गाची तपासणी केली होती. आता केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त जनककुमार गर्ग यांच्याकडून शुक्रवारपासून या मार्गाची अंतिम तपासणी सुरू झाली आहे. या तपासणीनंतर मेट्रो सेवेला अंतिम मंजुरी मिळेल. मागील वर्षाच्या अखेरीस रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाची मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणी आणि त्यांची मंजुरी घेण्याचा महामेट्रोचा प्रयत्न होता. मात्र, या मार्गावरील येरवडा स्थानकाचे जिने नगर रस्त्यावर येत होते. महामेट्रोकडून या जिन्यांसाठी खांब उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी वाहतूककोंडी होत असल्याने या कामाला विरोध केला. अखेर महापालिकेने हे जिने दुसरीकडे हलविण्यास महामेट्रोला सांगितले. महापालिकेच्या सूचनेनुसार महामेट्रोने येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या रचनेत काही बदल केले. या बदलामुळे येरवडा स्थानकाच्या जिन्याचे काही खांब पाडण्याची वेळ महामेट्रोवर आली. आता या मार्गाचे काम पूर्ण झाले आहे.

## आता दंडाची रक्कम तडजोड करून भरता येणार

### पुणे शहर वाहतूक शाखेचा पुढाकार


पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



पुणे वाहतूक शाखेने पुढाकार घेत वाहनांवरील दंडाची रक्कम तडजोड करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे तर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात असलेले प्रलंबित चलन केसेसचा निपटारा करणे करीता पोलीस उपआयुक्त वाहतूक शाखा येथे ९ सप्टेंबर २०२३ रोजी लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.सदर लोक अदालतीचे अनुषंगाने दिनांक २४ ऑगस्ट २०२३ रोजी पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा (येरवडा) या ठिकाणी सचिव, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण शिवाजीनगर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मोटार वाहन न्यायालय, शिवाजीनगर, यांचे समवेत बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार २८ ऑगस्ट २०२३ रोजीपासून वाहतूक शाखा येथे प्रलंबित वाहतूक चलनांचे तडजोडीनंतर दंडातील सवलतीबाबतच्या माहितीचा हेल्पडेस्क सुरु करण्यात येत आहे.त्याअंतर्गत लोकहितासाठी व प्रलंबित खटल्यांची निर्गती करण्यासाठी नागरिकांचे वाहनांवरील प्रलंबित असलेले वाहतूक नियमांचे भंग केलेल्या चलनाची निर्गती तडजोडअंती सूट देवून करण्यात येणार आहे.

ज्या वाहनचालकांच्या वाहनांवर वाहतूक नियमभंग केलेबाबत केसेस प्रलंबित आहेत, अशा वाहनचालक, मालक यांनी २८ ऑगस्ट २०२३ रोजी पासून सकाळी ११ ते २ व ३ ते ५ या वेळेत पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा येथे येवून आपले वाहनावर असलेल्या प्रलंबित केसेसच्या निर्गतीचे अनुषंगाने उपस्थित राहिल्यास वाहन चालकांवरील प्रलंबित दंडाची रक्कम तडजोडीनंतर वाहन चालकांवरील दंड चलान कमी होईल. पोलीस आयुक्त, यांचे संकल्पनेतून व पोलीस सह आयुक्त,यांचे मार्गदर्शनाखाली नागरिकांना 'जिल्हा हेल्पडेस्क' ही सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे.असे वाहतूक पोलिस उपायुक्त डॉ विजयकुमार मगर यांनी सांगितले आहे.



अयोध्यातील रामल्ला यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निम्मित अख्या भारतभर उत्सव साजरा होत आहे, त्याच बरोबर पिंपरी चिंचवड शहारत यमुनानगर (श्रीराम बाग) निगडी येथे नव्याने भव्यदिव्य असे प्रभू श्रीरामांचे मंदिर उभारले गेले आहे , अयोध्यातील प्राणप्रतिष्ठा चा मुहुर्त साधत यामुनानगर(श्रीराम बाग) येथे देखील प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची मिरवणूक दिनांक २० जानेवारी रोजी होणार असून , त्याच २१ जानेवारी २०२४ रोजी दिवस भर होमहवन, सायंकाळी ०६ वा कीर्तन होणार आहे व दिनांक २२ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वा .मूर्ती प्राणप्रतिष्ठा होणार आहे प्राणप्रतिष्ठा करीता प.पू. स्वामी कैलासनंदगिरी महाराज यांच्या हस्ते होणार आहे व महाप्रदासचा कार्यक्रम होणार आहे सायंकाळी गीतरामायण चा कार्यक्रम आहे, मंदिराचे संस्थापक मा.श्री एकनाथ दादा पवार ,श्री रंगनाथ पवार , श्री बाबा परब , श्री शिरीष जेधे , श्री अनिल वाणी , श्री गिरीश देशमुख , श्री अशोक वाळके ,श्री एकनाथ उगले , श्री रवींद्र कुकडे , श्री चंद्रकांत शेडगे ,श्री सखाराम सोलंकी , श्री सुदन परब , श्री धनाजी मोरे , श्री आनंदा जुनघरे, श्री मनोहर चौघुले , श्री विशाल केंदळे , श्री कृष्णा घोलप , कु रोहित काळभोर, श्री रमाकांत पाटील , कु प्रथमेश आंबेरकर ,आदी सर्वांनी मंदिरा करिता श्रम घेतले .सर्वांना कार्यक्रमाकरीत ट्रस्ट तर्फे विशेष निमंत्रण.

## महापालिकेच्या मराठी शाळा बंद होणार?

पिंपरी
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)

महापालिकेच्या सर्व शाळांचे सेमी इंग्रजी व इंग्रजीमध्ये रुपांतर करण्यासाठी पर्यवेक्षकांनी दोन दिवसांत माहिती देण्याचे तातडीचे परिपत्रक प्राथमिक शिक्षण विभागाने काढल्याने गोंधळ उडाला. परिपत्रक समाजमाध्यमावर प्रसारित झाल्याने महापालिकेच्या मराठी शाळा बंद होणार असल्याची चर्चा सुरू झाली. मात्र, या परिपत्रकातील विषय चुकला असून केवळ शाळांची माहिती मागविल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १०५ प्राथमिक शाळा आहेत. त्यामध्ये १४ ऊर्दू, दोन हिंदी तर उर्वरित ८९ शाळा मराठी माध्यमाच्या आहेत. या शाळांमध्ये ४० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी महापालिकेच्या शाळांची माहिती मागविली होती. त्यावर शिक्षण विभागाने शुक्रवारी तातडीचे परिपत्रक काढले. महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये सेमी इंग्रजी सुरू आहे काय? असल्यास कोणत्या वर्गापासून सुरू आहे. तसेच प्रत्येक प्रभागात एक इंग्रजी शाळा सुरू करण्याबाबतचा अहवाल मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने तातडीने दोन दिवसांच्या आत सादर करावा, जेणेकरून पुढील कार्यवाही करणे सोईस्कर होईल, असे परिपत्रक प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी संजय नाईकडे यांनी काढले होते. त्यामुळे गोंधळ उडाला होता.

# 'मला समजलेले बापू' निबंध स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## 75 हजारांची रोख पारितोषिके तर 23 जाने'ला बक्षीस वितरण : गोपाळदादा तिवारी यांची माहीती

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)



"राजीव गांधी स्मारक समिती व पुणे शहर माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ" यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित (इ. ८ वी ते १०वी) माध्यमिक शाळां मधील विद्यार्थ्यांकरीता, "मला समजलेले बापू अर्थात् महात्मा गांधी" या विषया वरील, निबंध स्पर्धेचा अंतिम टप्पा असुन शाळांकडुन देखील चांगला व सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

एकुण १४२४ निबंधांपैकी, ११६० निबंध स्पर्धे साठी पात्र ठरले असुन, त्यातील प्रती इयत्ता प्रथम(१), द्वीतीय(१) व तृतीय (२) = ४ व ११ उत्तेजनार्थ अशी प्रती इयत्ता १५ रोख पारितोषिके अशी सु ७५,००० ची रोख पारितोषिके दिली जाणार असल्याचे स्पर्धेचे संयोजक व निमंत्रक गोपाळदादा तिवारी यांनी सांगितले.

रोख पारितोषिके व सन्मान चिन्हां व्यतिरिक्त ही 'अभिनव शिक्षण संस्थे तर्फे विजेत्यांना राष्ट्रपुरषांची प्रेरणादायी पुस्तके' भेट दिली जाणार असून, निबंध स्पर्धेतील 'पात्र सहभागी विद्यार्थ्यांना' प्रशस्तिपत्रके देणार असल्याचे संयोजन समितीने जाहीर केले. सदरचा बक्षीस समारंभ मा जेष्ठनेते व केरळ चे माजी ऊपमुखमंत्री श्री रमेशजी चेनीतला व मान्यवर नेत्यांच्या हस्ते व विधान सभेचे माजी अध्यक्ष व कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष श्री नाना पटोले यांचे अध्यक्षते खाली संपन्न होणार असुन

प्रमुख पाहुणे मा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मा अशोकराव चव्हाण, काँग्रेस कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात, डॉ विश्वजित कदम समवेत इंडीया आधाडी नेत्यांच्या उपस्थितीमध्ये होईल. पुणे शहर माध्यमिक व ऊच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री सुजीत जगताप यांनी राजीव गांधी स्मारक समितीने धेतलेल्या निबंध स्पर्धेच्या माध्यमातुन झालेल्या प्रबोधनपर प्रयत्नांमुळे, देशाचा ईतिहास, स्वातंत्र्य लढा, महात्मा गांधींची तत्वे इ विषयी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल असे सांगितले व स्मारक समितीच्या कार्यांचे कौतुक केले.

पुणे शहरात 'निबंध स्पर्धेची' माहीती देणारे १५० बॅनर्स लावण्यात आले होते व शाळा प्रशासना कडुन देखील 'स्मारक समिती सदस्यांना' सन्मानाची वागणुक व सकारात्मक प्रतिसाद मिळाला असल्याचे गोपाळदादा तिवारी यांनी सांगितले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी, स्वातंत्र्य लढ्याचा ईतिहास, स्वातंत्र्या करीता शहीद झालेल्यांचे योगदान व 'स्वतंत्र - भारताची' ऊभारणी इ बाबत विद्यार्थ्यांना, निबंध स्पर्धेच्या माध्यमातुन अंतर्मुख करण्याचा अल्प प्रयत्न करण्यात आला आहे...!

बापूंना राष्ट्रपिता किताब कुणी व का दिला..? याची देखील माहीती विद्यार्थ्यांच्या ठायी असल्याचे दिसुन आले. महात्मा गांधींच्या विशाल नेतृत्व व व्यक्तिमत्वाचे,

बापूंच्या सत्य, अहिंसा, मानवता आदी असाधारण गुणांचे, स्वातंत्र्य लढ्याच्या अनेक पैलु व प्रसंगांचे, मानवी जीवना विषयीच्या दृष्टीकोनाची मीमांसा करण्याचा प्रयत्न आहे. भारत लोकशाही प्रधान देश आहे. हजारों हौतात्म्यांच्या बलीदानानंतर देशास स्वातंत्र्य मिळाले. बापूंच्या अहिंसावादी चळवळीत मोठ्या धर्मनिरपेक्ष शक्तींचा सहभाग होता. प्रदीर्घ स्वातंत्र्य लढ्याचा ईतिहास असलेल्या भारताच्या स्वातंत्र्याचे जननायक महात्मा गांधी होते..!

साधनांची वानवा व प्रतिकूल परिस्थितीत देखील, बापूं'नी कठोर निग्रह, ईश्वर निष्ठा व आत्मबळाच्या जिद्दीवर अहिंसात्मक व मुत्सदेगीरीच्या जोरावर स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. मातृभुमि विषयी प्रेम, श्रध्दा, निष्ठा व स्वावलंबनाची भावना त्यांनी लोकांमध्ये जागृत केली..! स्वार्थाचा त्याग करत "बापूंची ७ सामाजिक पापें व ११ व्रते" निर्धारीत केली.

(सिध्दांत बिना राजनिती, काम बिना धन) "तत्वहिन - राजकारण व विनाकष्ट-संपत्ती" ही महात्मा गांधींची ७ सामाजिक पापांपैकी २ प्रमुख पापे असल्याचे राजीव गांधी स्मारक समितीचे संस्थापक अध्यक्ष गोपाळदादा तिवारी यांनी सांगितले.

या प्रसंगी पुणे शहर माध्यमिक व ऊच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री सुजीत जगताप, कार्याध्यक्ष श्री शिवाजी शिंदे, सुभआषशेठ थोरवे, शाळांमध्ये निबंध स्पर्धेची माहीती पत्रक पोहोचवणे, निबंध गोळा करणे इ कार्य स्मारक समितीचे सदस्य भोला वांजळे, ॲड स्वप्नील जगताप, गणेश शिंदे, ॲड फैयाझ शेख, धनंजय भिलारे, संजय अभंग, गणेश मोरे, राजेश सुतार, नरेश आवटे इ उपस्थित होते.

# थोडक्यात



## राजमाता जिजाऊ जन्मोत्सव समिती तर्फे आदर्श माता पुरस्कार

पुणे (न्यूज प्रहार) : राजमाता जिजाऊ जन्मोत्सव समितीतर्फे जिजाऊ जयंती निमित्त लाल महाल येथे आदर्श माता पुरस्कार व कर्तुत्वान महिलाचा वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान पुरस्कार वितरण करण्यात आले यावेळी बाळ शाहीर यांनी पोवाडे व एकपात्री प्रयोग सादर केले व लाठी काठी पारंपारिक खेळ सादर करण्यात आले कार्यक्रम प्रमुख पाहुणे मा.अश्विनी कदम माजी अध्यक्ष स्थायी समिती म.न.पा . योगेश समीर माजी नगरसेवक संजय मोरे शिवसेना उद्धव ठाकरे शहर प्रमुख श्रावणी जगताप सौ. प्रतिभा रवींद्र धंगेकर या सर्वांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले तसेच सौ.पल्लवी जावळे माजी नगरसेवक यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी सुशील पवार अध्यक्ष संगिता भालेराव महिला अध्यक्ष मुकेश यादव तानाजीकाका शिरोळे राजेश मोरे प्रशांत धुमाळ राहुल तांबे युवराज दिसले वसंत खुटवड नारायण घुठे संध्याताई देशपांडे मनीष काळे रितिका पाडळे स्मिता पवार विशाखा भालेराव योगेश खोपडे तौर काका यांनी संयोजन म्हणून काम पाहिले प्रास्ताविक तानाजी शिरोळे सूत्रसंचालन ॲड संध्याताई देशपांडे राहुल तांबे व मुकेश यादव यांनी सर्वांचे आभार मानले भगिनी वर्ग नागरिक आदी उपस्थित होते.



## पैठण रोडवर विचित्र अपघात; सुसाट ट्रकने वाहनांना उडवले, एक ठार, सात जखमी

पुणे (न्यूज प्रहार) : छत्रपती संभाजीनगर: पैठण रस्त्यावरील वाल्मी नाकाजवळ शुक्रवारी सायंकाळी साडेसात वाजता भीषण अपघात झाला. सोलापूरकडून धुळ्याच्या दिशेने जाणारा सुसाट ट्रक वाहतूक खोळंबल्याने थांबलेल्या वाहनांना उडवत गेला. या विचित्र अपघातात एक ठार तर सात जखमी झाले आहेत. जखमींमधील तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे. शुक्रवारी साडेसात वाजण्याच्या सुमारास ही भीषण अपघात झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर-धुळे महामार्गावरून वाल्मीनजीकच्या पुलाखालून जाण्यासाठी एक ट्रक भरधाव वेगात उतारावरून आला. चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगात पाच ते सहा वाहनांना धडक देत पुढे आला. यामध्ये चार ते पाच दुचाकी, दोन-तीन कार, एक रिक्षा अशा वाहनांना धडक दिली. यामध्ये एक दुचाकी कार ट्रकमध्ये चिरडली गेली. यातील एक जण ठार झाला आहे. तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे. इतरही वाहनांवरील काहीजण जखमी झाले असून सातपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातानंतर सातारा ठाण्याच्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना घाटीमध्ये हलवण्यात आले.

## शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीला पोलिसांचा हिसका



पुणे (न्यूज प्रहार) : शरद मोहोळ हत्या प्रकरणाचा मास्टरमाईंड विठ्ठल शेलार याची पोलिसांनी राहत्या घरापासूनच धिंड काढली. मोहोळ हत्या प्रकरणाचा तपास सुरू असताना पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने १९ जानेवारी ला एक मोठी कारवाई केली. शेलार हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. पोलिसांनी पोलीसी खाक्या दाखवत गुन्हेगारांची दहशत कमी करण्यासाठी जिथे लहानाचा मोठा झाला त्याच राहत्या घराच्या परिसरातून त्यांची धिंड काढली आहे. पुण्यातील कुख्यात गुंड शरद मोहोळ याची पाच जानेवारीला गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. लग्नाच्या वाढदिवशीच आरोपी मुन्ना पोळेकर आणि त्याच्या साथीदारांनी शरद मोहोळवर भररस्त्यात गोळीबार केला होता. कोथरूडमधील सुतारदरा परिसरामध्ये हा भयानक प्रकार घडला. दरम्यान, शरद मोहोळ हत्येतील दुसरा मुख्य आरोपी असलेल्या विठ्ठल शेलारचे गाव मुठा गावापासून नऊ किलोमीटर अंतरावर असलेलं उरवडे गाव आहे. मुळशी खोऱ्यातील या लहान गावांमध्ये वर्चस्व कोणाचं राहणार यातून निर्माण वादातून शरद मोहोळची हत्या झाल्याचं समोर आलं आहे. दरम्यान, शरद मोहोळची भररस्त्यात हत्या केल्यानंतर नागरिकांच्या मनात आरोपी शेलार याच्याविषयी दहशत पसरली होती. हीच दहशत मिटवण्यासाठी पोलिसांनी शेलार याची भररस्त्यावरून धिंड काढली आहे, या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मिडीयावर वायरल होत आहे. एवढंच नाही, तर शेलारची बुलेटप्रूफ स्कॉर्पिओ गाडी देखील जप्त करण्यात आली आहे.

## चित्रपटगृहे होणार ‘श्रीराम’मय! प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे मोठ्या पडद्यांवर थेट प्रक्षेपण

पुणे (न्यूज प्रहार) : अयोध्या येथील श्रीराम मंदिर उद्घाटन आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. श्रीरामभक्तांना मोठ्या पडद्यावर पाहता येणार असून, देशभरातील बहुपडदा चित्रपटगृहांमध्ये हा सोहळा थेट प्रक्षेपणाद्वारे दाखवला जाणार आहे. श्रीराम मंदिर उद्घाटन आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त केंद्र सरकार आणि राज्य सरकराकडून सुटी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे शाळा-महाविद्यालयेही बंद राहणार आहेत. या सोहळ्यासाठी अयोध्यानगरी सज्ज झाली आहे. देशभरातील भाविक या सोहळ्यासाठी अध्योध्यानगरीत पोहोचले आहेत. या सोहळ्याचे दूरचित्रवाणीवरून थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. चित्रपटगृहांमध्ये चित्रपटांव्यतिरिक्त क्रिकेटचे सामनेही काही वेळा दाखवले जातात. मात्र आता अयोध्या येथील श्रीराम मंदिर उद्घाटन आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचेही थेट प्रक्षेपण चित्रपटगृहांद्वारे केले जाणार आहे.

# फेक न्यूजच्या जमान्यात सजग पत्रकारितेची गरज

## संजय आवटे यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त सूर्यभारत पत्रकारिता सन्मान-२०२४ सोहळा उत्साहात




पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)

शिक्षण आणि पत्रकारिता ही दोन्ही क्षेत्रे एकमेकांना पूरक आहेतच; शिवाय ते दोन्ही समाज घडविण्याचे काम करतात. औपचारिक शिक्षणातून विद्यार्थी घडत जातो. अनौपचारिक शिक्षणातून माणूस व समाज घडतो. त्यामुळे सर्वांगीण शिक्षणावर भर द्यायला हवा. प्रत्येकाने आपली मूल्ये जपत कर्तव्य भावनेतून कार्य करायला हवे," असा सूर परिसंवादात उमटला.

मराठी पत्रकार दिन, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सूर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशनच्या वतीने आयोजित पत्रकारिता सप्ताहाचा समारोप, 'सर्वांगीण शिक्षण व पत्रकारिता' या विषयावर परिसंवाद आणि ‘सूर्यदत्त सूर्यभारत पत्रकारिता सन्मान २०२४’ सोहळ्यात पुण्यातील विविध दैनिकाच्या संपादकांनी आपले विचार मांडले.

पत्रकार भवन येथे झालेल्या सोहळ्यात लोकमतचे संपादक संजय आवटे, महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक श्रीधर लोणी, भास्करचे समूह संपादक प्रकाश दुबे, आज का आनंदचे संपादक आनंद अग्रवाल, सामनाचे सहसंपादक अरुण निगवेकर, प्रभातचे संपादक अविनाश भट, पुण्यनगरीचे संपादक श्रीकांत साबळे, राष्ट्रसंचारचे संपादक अनिरुद्ध बडवे, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष पांडुरंग सांडभोर, सूर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा संजय चोरडिया, संचालक प्रशांत पितालिया, सल्लागार मंडळ सदस्य जीवराज चोले आदी उपस्थित होते.

श्रीधर लोणी म्हणाले, "लोकशिक्षण हा पत्रकारितेचा मूळ गाभा हा आहे. शिक्षणामुळे विषमता दूर होण्याची संधी मिळते. गेल्या काही वर्षांमध्ये खासगी शिक्षण संस्थांची संख्या वाढली आहे. खासगी शिक्षण संस्थांमुळे शिक्षणासा प्रसार झाला आहे. मात्र, शिक्षण महाग झाले आहे. त्यामुळे ज्यांची आर्थिक परिस्थिती नाही, अशांना शिक्षण घेणे कठीण झाले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जीडीपीच्या सहा टक्के शिक्षणावर खर्च करण्याची गरज आहे." संजय आवटे म्हणाले, "शिक्षण आणि पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रांचे सार्वत्रीकरण झाले आहे. सद्यस्थिती लक्षात घेता माध्यमांनी आणि पत्रकारांनी दक्ष राहून काम केले पाहिजे. समाजाभिमुख पत्रकारितेची आज गरज भासते आहे. आभासी जगात, फेक न्यूजच्या जमान्यात आपण काम करतो आहोत. अशावेळी अधिक सजगपणे नीतिमूल्यांशी तडजोड न करता निर्भीडपणे आपण भूमिका मांडत राहिले पाहिजे. समाजाला दिशा देणाऱ्या, युवा पिढीला सर्वांगीण पद्धतीने घडवणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन द्यायला हवे. प्रकाश दुबे म्हणाले, "बातम्या प्रसिद्ध केल्यामुळे संपादक आणि पत्रकारांवर गुन्हे दाखल केले जातात. त्यामुळे अनेक गंभीर घटनांची दखल घेतली जात नाही. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याने या क्षेत्रावर होणारे हल्ले थांबले पाहिजेत. त्यातूनच निर्भयपणे निर्भीड पत्रकारिता होऊ शकेल आणि समाजाच्या असंख्य समस्याना वाचा फोडता येईल." आनंद अग्रवाल म्हणाले, "शिक्षण तुम्हाला वैयक्तिक आणि सामाजिक उत्कर्षाची संधी देते. सर्वांगीण शिक्षण घेतले, तर कोणत्याही क्षेत्रात तुम्हाला यशाकडे वाटचाल करता येते. पत्रकारितेत येणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक ज्ञानाचा अनुभव घ्यावा. सर्वांगीण विकासाचे दर्जेदार शिक्षण देण्याचा ध्यास घेऊन २५ वर्षे सूर्यदत्त संस्था कार्यरत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे."

प्रशांत पितालिया यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. जीवराज चोले यांनी सूत्रसंचालन केले. सुषमा चोरडिया यांनी आभार मानले.

### प्रतिक गंगणे यांना ‘सूर्यदत्त सूर्यभारत पत्रकारिता सन्मान २०२४’ प्रदान



मराठी पत्रकार दिन, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सूर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशनच्या वतीने आयोजित ‘सूर्यदत्त सूर्यभारत पत्रकारिता सन्मान २०२४’ सोहळा संपन्न झाला. यावेळी लोकमतचे संपादक संजय आवटे यांनी प्रतिक गंगणे यांचे तोंडभरून कौतुक केले आणि उपस्थित संपादकांनी कौतुकाची थाप दिली. यावेळी मनोज रानडे (सामना), शैलेश काळे (आज का आनंद), लक्ष्मण मोरे (पुणे टाइम्स मिरर), राजू हिंगे (लोकमत), मीनाक्षी गुरव (सकाळ), हर्ष दुधे (महाराष्ट्र टाइम्स), विजय चव्हाण (केसरी), गणेश खळदकर (पुढारी), निलेश चौधरी, (पुण्यनगरी), सलोनी मिस्त्री (टाइम्स ऑफ इंडिया), शिवराज सणस (आकाशवाणी), योगेश बोरसे (टीव्ही ९ मराठी), अमोल धर्माधिकारी (लोकशाही न्यूज), सचिन जाधव (साम टीव्ही), सागर आव्हाड (झी २४ तास), मंगेश फल्ले (दिव्यमराठी), व्यंकटेश भोळा (प्रभात), उद्धव धुमाळे (लोकमत), यशवंत सिंह (नवभारत), प्रतीक्षा पारखी (एनडीटीव्ही), सोनाली भालेसईन (पोलिसनामा), प्राजक्ता जोशी (इंडी जर्नल), सारिका रोजेकर (राष्ट्रसंचार), अभिजित दराडे (महाराष्ट्र टाइम्स ऑनलाईन), ज्ञानेश्वर चौतमल (पुढारी न्यूज), यांना ‘सूर्यदत्त सूर्यभारत पत्रकारिता सन्मान २०२४’ देऊन गौरविण्यात आले.



प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "पत्रकार हा लोकशाहीचा एक खांब असल्याचे आपण मानतो. चांगल्याला प्रोत्साहन आणि वाईटावर प्रहार करणारी पत्रकारिता समाजाच्या हिताची ठरते. सूर्यदत्त संस्थेच्या गेल्या २५ वर्षांच्या प्रवासात माध्यमांनी दिलेले प्रोत्साहन मोलाचे राहिले आहे. सर्वांगीण विकासाचे व वैश्विक दर्जाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना सर्वार्थाने घडविण्याचा प्रयत्न आम्ही करत असतो. पत्रकार दिनाचे औचित्य साधून सूर्यदत्तमध्ये पत्रकारिता सप्ताहाचे आयोजन केले होते. त्यातून विद्यार्थ्यांना अनेक चांगल्या गोष्टी शिकता येतात. आंतरशाखीय शिक्षणावर आम्ही भर देत आहोत. या प्रवासात आपल्या सर्वांचे सदैव सहकार्य असते. वृत्तपत्र वाचन हा तरुणांच्या, नागरिकांच्या दिनचर्येचा अविभाज्य भाग व्हायला हवा. तसेच कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी माध्यमांचे महत्व, त्यांची ओळख करून घ्यायला हवी."

# भर दिवसा कोण गोळ्या घालतो, गुन्हेगारांचे होर्डिंग लागतात कसे?

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)

पोलिस स्टेशनमध्ये काम करताना कोणताही भेदभाव करू नका, सत्ताधारी पक्षाचा असो की विरोधी पक्षाचा, चुकला तर कारवाई झालीच पाहिजे. पोलिसांचा वचक असला पाहिजे, गुन्हेगारांचं होणारे उदात्तीकरण थांबले पाहिजे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे पोलिसांना कानपिचक्या दिल्या. उरुळी कांचन येथील पोलीस स्टेशन उद्घाटनाच्या कार्यक्रमात अजित पवारांनी पोलिसांना खडे बोल सुनावले. पोलिस दलात 50 टक्के ऐवजी 100 टक्के नोकर भरती करणार असल्याचेही पवार म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या सहीनंतर कॅबिनेटची मिळणार मंजुरी त्याला मिळेल, असेही त्यांनी सांगितले. अजित पवार म्हणाले की, पुण्यात काही दिवसांपूर्वी गुन्हेगारीच्या घटना घडल्या, कोण कुणाला गोळ्या घालतो, पण पोलिसांनी तात्काळ कारवाई करत गुन्हेगारांना पकडलले. ससूनमध्ये हॉस्पिटलमध्ये जे घडलं त्यात कुणाचाच मुलाहिजा बाळगणार नाही, असं गृहमंत्र्यांनी सांगितले आहे. कोणी कितीही मोठा असो, कितीही मोठ्या बापाचा असो, त्याला सोडणार नाही. कुठे काही कानावर आले आणि कोणी काही चुकलं तर देवेंद्रजी सस्पेंड करत नाहीत तर थेट बडतर्फ करतात.

### अजित पवारांकडून पुणे पोलिसांना थेट कानपिचक्या



# राष्ट्रवादी काँग्रेसचा पदाधिकारी, गुरुजी बनून फसवणूक

## दररोज नवं सीम वापरायचा; तीन धाम यात्रेनंतर आयोध्येला जाण्याआधी पोलिसांनी ठोकल्या बेड्या!

मुंबई
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)

मुंबईच्या चारकोप परिसरात राहणारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा पदाधिकारी गुरुजी उर्फ ऋषी पांडे याला महिलेची फसवणूक केल्याप्रकरणी बोरिवली पोलिसांनी अटक केली आहे. पांडे हा पोलिसांसोबत ओळख आहे, तुम्हाला मदत करतो असे सांगून अनेकांकडून लाखो रुपये उकळत होता. याप्रकरणी त्याच्याविरुद्ध बोरिवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांना गुंगारा देत आरोपी ऋषी पांडे हा मथुरा, गुजरात सोमनाथ उज्जैन अशा विविध मंदिरात जाऊन देवदर्शन करून अयोध्येला जाण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी गुजरात येथून त्याला अटक केली आहे. आरोपी पांडे हा सध्या बोरिवली पोलिसांच्या ताब्यात असून त्याने कुणाकुणाची फसवणूक केली यासंदर्भात अधिक तपास सुरु आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरिवली परिसरात राहणाऱ्या एका महिलेने फेसबुकवर एक पोस्ट टाकली होती. या फेसबुक पोस्टवरून मोठा वादही निर्माण झाला होता. परिणामी प्रकरण बोरिवली पोलीस ठाण्यात गेले. दरम्यानच्या काळात महिलेची ओळख गुरुजी उर्फ ऋषी पांडे याच्यासोबत झाली. ऋषी पांडे याने माझी पोलिसांसोबत ओळख असून प्रकरण मिटवण्यासाठी महिलेकडून पोलिसांच्या नावावर चेक द्वारे लाखो रुपये घेतले, मात्र या प्रकरणात पांडेंकडून महिलेला कोणतीही मदत झाली नाही.

यानंतर महिलेने ऋषी पांडेंकडे दिलेले पैसे परत देण्यासाठी तगादा लावला. पांडेंने महिलेचे फोन घेणे बंद केले. आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात येताच तिने गुरुजी उर्फ ऋषी पांडे विरोधात तक्रार दिली. त्यानुसार बोरिवली पोलिसांनी आरोपी विरोधात कलम 420 अन्वये गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक निनाद सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी एपीआय बापू घोडके आणि पीएसआय कल्याण पाटील यांच्या तपास पथकाने आरोपीचा माग घेण्यास सुरुवात केली.

तेव्हापासून आरोपी गुरुजी उर्फ ऋषी पांडे हा पोलिसांना गुंगारा देण्यासाठी आपला मोबाईलनंबर सतत बदलून उत्तर भारतात देव दर्शनासाठी फिरू लागला. आरोपीने मध्य प्रदेशातील उज्जैन, गुजरातमधील सोरटी सोमनाथ या धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. तो अयोध्येला जाण्यापूर्वीच बोरवली पोलिसांनी त्याला गुजरातमधील सुरत येथून अटक केली आहे.

बोरिवली पोलिसांनी आरोपीला शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. बोरिवली पोलीस आरोपीने अजून कुणाकुणाची फसवणूक केली आहे का? या संदर्भात अधिकचा तपास करत आहेत.

# गुंड विठ्ठल शेलारची ‘बुलेटप्रुफ स्कॉर्पिओ’ पाठलाग करून पकडली

## शरद मोहोळ खूनप्रकरणात सहा महागड्या गाड्या जप्त

पुणे
(न्यूज प्रहार प्रतिनिधी)

कुख्यात गुंड शरद मोहोळ खून प्रकरणात पुणे पोलिसांनी अटक केलेल्या गुंड विठ्ठल शेलारची बुलेटप्रूफ स्कॉर्पिओ गाडी जप्त केली आली आहे. विठ्ठल शेलारने पांढऱ्या रंगाची ही स्कॉर्पिओ गाडी त्याच्या पुनावळे येथील फार्म हाऊसवर लपवून ठेवली होती. मात्र, गुन्हे शाखेच्या पोलिसांना या गाडी विषयी माहिती मिळाल्यानंतर त्यांनी ती ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली होती. तोपर्यंत विठ्ठल शेलारच्या साथीदारांनी ही गाडी इतरत्र हलवण्याचा प्लॅन केला होता. त्याप्रमाणे विठ्ठलचे साथीदार ही गाडी घेऊन निघालेही होते. परंतु, पोलीस ही गाडी जप्त करतील, या भीतीपोटी त्यांनी लपून ठेवण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या होत्या.

मात्र, पोलिसांना याची माहिती काही वेळातच मिळाली. पोलिसांनी तिचा पाठलाग सुरू केला. वाकडच्या भागात ही कार आली असतानाच या कार घेऊन जाणाऱ्यांना पोलीस मागावर असल्याचीही माहिती मिळाली. त्यांनी लागलीच ही कार रस्त्याच्या बाजूला सोडत पळ काढला. त्यानंतर पोलिसांनी सदर कार ताब्यात घेतली.

पोलीस आपल्या मार्गावर असल्याचे समजल्यानंतर त्यांनी गाडी रस्त्यात सोडून पळ काढला. त्यानंतर पुणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ही कार जप्त केली आहे. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत सहा महागड्या कार जप्त केल्या आहेत.

शरद मोहोळ खून प्रकरणात पुणे पोलिसांनी आतापर्यंत 15 जणांना अटक केली आहे. अटकेत असलेल्या आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी आतापर्यंत क्रेटा, इंनोव्हा, फॉर्च्युनरसह सहा कार जप्त केल्या आहेत. आरोपींकडे असणाऱ्या गाड्यांविषयी माहिती घेत असतानाच पोलिसांना विठ्ठल शेलारच्या बुलेटप्रुफ कार विषयी माहिती मिळाली होती.

दरम्यान, कुख्यात गुंड शरद मोहोळ याचा पाच जानेवारी रोजी त्याच्या राहत्या घराजवळ खून करण्यात आला होता. मुन्ना पोळेकर आणि त्याच्या साथीदारांनी गोळ्या झाडून खून केला. शरद मोहोळचा खून होण्यापूर्वी एक महिना आधी विठ्ठल शेलार आणि गणेश मारणे यांच्यात मिटिंग झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. गणेश मारणे टोळीचा सदस्य असलेला गुंड विठ्ठल शेलार हा मुळचा मुळशी तालुक्यातील उरवडे गावचा रहिवासी आहे. त्याच्यावर खून, खूनाचा प्रयत्न, अपहरण आणि खंडणीचे अनेक गुन्हे दाखल आहेत. २०१४ मध्ये त्याच्यावर मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच त्याला अटकही झाली होती. २०१७ मध्ये त्याची जामीनावर सुटका करण्यात आली होती.

